# राजर्षी शाहू महाराज यांचे शेतीविषयक समकालीन विचार

**PROF. DR. P. S. KAMBLE,** Senior Proffesor, Dept Of Economics Shivaji University, Kolhapur

**SHRI. VIJAY HARIBA PAWAR,** M. A., M. Phil., Set The New College, Kolhpur.

---

**प्रास्ताविक -** राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून इ.स. १८७४ रोजी लक्ष्मीविलास पॅलेस, कसबा बावडा कोल्हापूर येथे झाला. कागल येथील **घाटगे** घराणे हे त्यांचे मूळ घराणे. त्यांचे मूळ नांव **यशवंत**, त्यांच्या वडिलांचे नांव जयसिंगराव (आप्पासाहेब) तर आईचे नांव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले, व **'शाहू'** (द्वितीय)हे नांव ठेवले.२एप्रिल, १८९४रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला.त्यांचे शिक्षण ब्रिटिश अधिकारी **फ्रेजर** यांच्या हाताखाली झाले. पुढील शिक्षण राजकोटच्या राजकुमार कॉलेज मध्ये व धारवाड येथे झाले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. गुरुवारी फ्रेजर लिहितात – "शाहूराजे खूप धिप्पाड आहेत. त्यांचे वजन १९७ पौंड असून त्यांची उंची ५ फुट ९ इंच आहे. त्यांची चालण्याची ढब मर्दानी ऐटबाज आहे."[i]

ब्रिटीश सरकारद्वारा त्यांना 'महाराजा' ही पदवी दि. २४ में,१९०० रोजी देणेत आली. दि. १९ एप्रिल,१९१९ रोजी त्यांना 'राजर्षी' ही पदवी देणेत आली. नाशिकच्या जनतेकडून त्यना दि.१६ एप्रिल,१९२० रोजी मानपत्र देणेत आले.

**अभ्यासाची उद्दिष्टें:**

१. राजर्षीं छत्रपती शाहू महाराजांच्या तत्कालीन शेतीविषयक धोरणांचा अभ्यास करणे


२. छ. शाहू महाराजांच्या काळातील शेतकऱ्यांच्या जीवनमानाचा स्तर अभ्यासणे

३. छ. शाहू महाराजांनी राबविलेल्या शेतीविकास योजनांचा अभ्यास करणे

४. तत्कालीन कोल्हापूर संस्थानात शेतीविषयक धोरणांतून मिळालेल्या फायद्यांचा अभ्यास करणे

५. राजर्षींच्या तत्कालीन शेतीविषयक धोरणांची समकालीन प्रस्तुतता अभ्यासणे.

**करवीर (कोल्हापूर) संस्थान:**




**संशोधन पद्धती:**

माहितीचे संकलन – या पेपरमध्ये मांडलेली माहिती दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे. यासाठी, पुस्तकें, नियतकालिकें, प्रकाशित साहित्य, तसेच इंटरनेट सुविधा यांचा वापर केलेला आहे.

नमुना स्वरूप -सदर पेपरमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कारकिर्दीतील कोल्हापूर संस्थांन विषयी असलेने फक्त कोल्हापूर संस्थानची माहिती दिलेली आहे.

समस्येची निवड-छत्रपती शाहू महाराजांच्या करवीर संस्थानामध्ये त्याच्या कारकिर्दीत जनतेचा प्रमुख व्यवसाय शेती हा होता. परंतु या संस्थानातील लोक अपुऱ्या साधनांसहित केवळ परंपरागत शेती करीत होते. त्यामुळे त्यांना शेतीतून अल्प उत्पादन आणि कमी उत्पन्न मिळत होते. छत्रपती शाहूनी हे चित्र बदलण्यासाठी शेतीविकासाचे धोरण अवलंबले. त्यांच्या या शेतीविषयक धोरणांची प्रस्तुतता आजच्या काळामध्ये सुध्दा लागू पडते.

गृहीतक : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी राबविलेली शेतीविकासाची धोरणें आजही लागू पडत असून त्यांना आवश्यक त्या प्रमाणात प्राथमिकता दिली गेलेली नाही.

**शेतीविषयक धोरण**[ii]–शाहूनी कारभाराची सूत्रें हाती घेतल्यापासूनच करवीर संस्थांच्या शेतीविकासासंदर्भात आग्रही भूमिका घेतलेली दिसून येते. राजर्षीची शेतीची आवड लक्षात घेवून सन १९०२ च्या युरोप दौऱ्यात 'रॉयल अग्रीकल्चरल सोसायटी ऑफ इंग्लंड' या शेती संशोधन संस्थेने त्यांना आपले सदस्यत्व बहाल केले होते. शेतीचे महत्व विषद करताना एका भाषणात ते म्हणाले होते, " देशातील ८० % लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. माझ्या संस्थानाच्या दृष्टीने विचार केला असता कृतीरुपाने माझे सर्व राज्यच शेतीच्या प्रगतीवर अवलंबून आहे. त्यामुळ्ये माझ्या संस्थानातील प्रत्येक व्यक्तीला शेती विकासाच्या दृष्टीकोनातून मदत करण्यासाठी मी स्वत: कष्ट घेत आहे." राजर्षीच्या काळात शेतीला कनिष्ट व्यवसाय मानले जात होते. हे ध्यानात घेवून कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाला उद्देशून भाषण करताना त्यांनी सांगितले,-"कृषिकर्म[iii] इतके पवित्र आहे की, वैदिक काळात आरशातून एकदा चक्रवर्ती राजा व त्याचे मंत्रीही नांगर हाकीत असत. ज्याच्या योगाने भूमीमध्ये एक दान टाकून हजारो दाणें मिळतात, व ज्या कृषिकर्मावर सारी मनुष्यजात उपजीविका करते ते कृषिकर्म हलके अथवा वाईट मी मुळीच मानीत नाही." कुर्मी क्षत्रिय समाजाने शाहू महाराजांना '**राजर्षी**' ही उपाधी दिली. राजर्षी केवळ हे विचार मांडून थांबले नाहीत. तर त्यांनी आपल्या युवराजाला (राजाराम महाराजांना) कृषी विद्या शिकण्याकरिता विलायतेला व अलाहाबादला कृषी स्कूलमध्ये पाठविले होते.

**शेती आणि शिक्षण यांचा पारस्पारीक संबंध** - शेती आणि शिक्षण यांची सांगड घालताना राजर्षी स्पष्ट करतात – " शेतकीच्या व्यवसायामध्ये जरी आमच्यातील बहुतेक लोक गुंतले असले तरी त्यातसुद्धा शिक्षणाची आम्हास जरुरीच आहे. हल्लीच्या काळी शेतकी इतकी पद्धतशीर झाली आहे की, ज्याला यात यश मिळवायचे आहे त्याला या विषयावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत व समजली पाहिजेत." राजर्षींनी जाणले होते की भारतीय शेतकरी कष्टाला कमी पडत नाही. परंतु, कष्टाच्या मानाने त्याला उत्पादन व उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे त्याला सर्वप्रथम शिक्षण देणे गरजेचे आहे, ज्यामुळे तो शेतीत आधुनिकता आणू शकेल. याचाच भाग म्हणून त्यांनी १९१७ साली आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले होते. १८९६ साली त्यांनी राजाराम हायस्कूलमध्ये शेती हा नवीन विषय सुरु केला होता जेणेकरून विद्यार्थ्यांना लहान वयातच शेतीची गोडी लागावी. राजर्षीनी १९१२ साली ' दि किंग एडवर्ड अॅग्रीकल्चरल इन्स्टीट्युट' ची स्थापना कोल्हापुरात करून जनतेला सुधारित शेतीपद्धतीची माहिती देण्याची व्यवस्था केली होती. २० जानेवारी १९१३ रोजी त्यांनी **'शेती सुधारणा'** या पुस्तकाच्या १०० प्रती विकत घेवून त्या संस्थानातील शाळांच्या ग्रंथालायांम्ध्ये ठवल्या. परदेशी शेती शिक्षण घेणाऱ्या विध्यार्थ्यांना त्यांनी आर्थिक मदतीबरोबरच बिनव्याजी कर्जपुरवठा केला होता.

**नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब -** कोल्हापूर संस्थान पूर्णत: शेतीवर अवलंबून असणारे संस्थान होते. लोकसंख्येचा भारपूर्णत: शेतीवर होता. बेरोजगारीचे प्रमाण वाढलेले होते. म्हणून राजर्षीनी शेतीतील अतिरिक्त मजुरांना उद्योगधंद्याकडे वळविण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता. तसेच, परंपरागत शेतीतून प्रगती नाही हे ओळखून त्यांनी शेतीत नवनवे तंत्रज्ञान, यंत्रे व बी-बियाणांचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांनी अत्यल्प व्याजाने शेतकऱ्याना कर्जपुरवठा केला होता. त्यासाठी त्यंनी १९०४ साली 'व्हिक्टोरिया मेमोरियल फंड' ची स्थापना केली.

**शेतमाल विक्रीव्यवस्था -** कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतमाल विकण्यासाठी शेती संघटनांचा अभाव होता. त्यामुळे या शेतकऱ्यांचे सावकार, दलाल आणि व्यापारी मोठ्या प्रमाणात शोषण करीत होते. यावर उपाय म्हणून राजर्षींनी १९१२ साली कोल्हापूर संस्थानात सहकारी कायदा लागू केला. शेतीला सहकाराची जोड दिल्यामुळे संस्थानात मोठ्या प्रमाणात कृषी पतपेढ्यांची निर्मिती झाली. शेतकऱ्यांना अल्प व्याजाने पतपुरवठा होवू लागला. आजही कोल्हापुरात असलेले **शाहू मार्केट यार्ड** हे राजर्षीच्या विचारांचे प्रतिक आहे.

**जलसिंचन व्यवस्था-** राजर्षीनी १९०२ साली संपूर्ण संस्थानाचा जलसिंचनाचा आढावा ( इरिगेशन सर्वे) तज्ञांकडून करून घेतला होता. १८९४ सालापासूनच त्यांनी संस्थानात जलसिंचन सुविधांचा प्रारंभ केलेला होता. आपल्या संस्थानातील जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी कोल्हापूर पद्धतीचे बंधारें बांधले, तलाव व विहिरीं बांधल्या, जुन्या विहिरीं दुरुस्त केल्या. त्याकाळी संस्थानात १८९६ पासून तीन मोठे दुष्काळ पडले होते. यावर मात करण्यासाठी त्यांनी कायमस्वरूपी पाण्याशी संबधित उपाययोजना हाती घेतली. राजर्षीची ही उपाययोजना म्हणजे **'राधानगरी धरण योजना'.** याची सुरुवात १८ फेब्रुवारी,१९०७ इ.रोजी केली.दुर्दैवाने राजर्षीच्या काळात ते धरण पूर्ण होवू शकले नाही; ते त्यांचे पुत्र छ. राजाराम महाराज यांनी १९३५ साली पूर्ण केले. या प्रकल्पाचा रु.१३,३६, १३०/- खर्च होता. या प्रकल्पावरील खर्चाखेरीज इतर जलसिंचन सुविधांवर राजर्षींनी प्रतिवर्षी रु. ७५९६०/- इतकी रक्कम खर्च केली. या

धरणामुळेच कोल्हापूर संस्थानात हरित क्रांतीची सुरुवात झाली. राजर्षींच्या काळात विहिरी, नदी आणि तलाव हा देखील जल सिंचनाचे प्रमुख स्रोत होते. संस्थानातील लोकना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून त्यांनी विहिरींची संख्या १२०५७ पर्यंत वाढवली. विहिरी, नदी आणि तलाव या जलसिंचनाच्या माध्यमातून साल १९२१-२२ मध्ये संस्थानातील २७ हजार एकर क्षेत्र सिंचनाखाली आणले. असे होते राजर्षींचे जलव्यवस्थापन.

**प्रयोगशील शेती -** सर्वात महत्वाची आणि उल्लेखनीय बाब म्हणजे राजर्षींची शेतीविषयक प्रयोगशील दृष्टीकोन ही आहे. त्यांनी आदर्श शेतीचा प्रयोग सतत सुरु ठेवला होता. त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी पिक लागवडीचे प्रयोग केले. अशा प्रयोगांमध्ये काहीवेळा त्यांना तोटा सहन करावा लागला. तरीदेखील ते थांबले नाहीत. त्यांनी राजाराम कॉलेजला लागून असलेल्या जमिनीमध्ये आधुनिक शेतीचा प्रयोग केलेला होता. यामध्ये सर्वात यशस्वी झालेले प्रयोग म्हणजे पन्हाळगड व भुदरगड पेठ्यात राजर्षींनी लागवड केलेले चहा व कॉफीचे मळें हे होय. यावरून राजर्षींच्या शेतीच्या आधुनुकीकरणासंबंधातील दृष्टीकोन व प्रयोगशील वृत्तीचे दर्शन होते. संस्थानातील लोकांना प्रात्यक्षिक स्वरुपात शेतीचे आधुनिक स्वरूप दाखविण्यासाठी आणि विविध भागातील शेतीची प्रगती लोकांना समजण्यासाठी त्यांनी शेती प्रदर्शनें भरविण्याची युक्ती वापरली. ६ फेब्रुवारी १८९६ रोजी त्यांनी चिंचली यथे पहिले शेती व जनावरांचे प्रदर्शन भरविले. चिंचलीचा भाग कर्नाटक सीमेला लागून असलेने सदर प्रदर्शनाचा लाभ कर्नाटकातील जनतेलाही झाला. आपली संस्थानातील लोकांसाठी पुढील वर्षीचे प्रदर्शन त्यांनी खासबाग, कोल्हापूर येथे भरविले. ते जिल्यातील अनेक गांवांमध्ये कृषीप्रदर्शनें भरवित असत.


**शेतीपूरक उद्योग-** राजर्षी शाहुना माहित होते की, शेती ही मान्सूनवर अवलंबून आहे. त्यावेळी संस्थानात पुरेशा प्रमाणात जलसिंचनाच्या सुविधा नव्हत्या. त्यामुळे जनतेने शेती आधारित जोड व्यवसाय करणे गरजेचे आहे असे त्यांना वाटे. म्हणून त्यांनी शेतीच्या बांधावर घायपात लावून त्यापासून दोर बनविण्यास त्यांनी उत्तेजन दिले. याबरोबरच मेंध्यापालन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, इ. व्यवसायांना उत्तेजन दिले. जोडव्यवसाय विकसित करण्यासाठी त्याने इटली दौऱ्याच्यावेळी त्या ठिकाणाचे अनेक जोडव्यवसाय पहिले. त्यातील मधुमक्षिका पालन व्यवसाय त्यांना खूप आवडला होता.

**शेतीविभाजानास विरोध -** भारतातील शेती उत्पादन वाढीच्या मार्गातील महत्वाचा अडसर म्हणजे जमिनीचे तुकडीकरण होऊन जमिनीचा लहान झालेला आकार होय. या लहान जमिनीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि यंत्रांचा वापर करणे शक्य होत नाही. परिणामी, उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट घडून येते. हे राजर्षींनी जाणले होते. म्हणूनच ते नेहमी म्हणत, शेतजमिनीचा लहान आकार ही भारतीय शेतीतील महत्वाची कमतरता आहे. उत्पदान वाढवायचे असेल तर जमिनीचा आकार मोठा असला पाहिजे. म्हणून राजर्षींनी संस्थानातील सर्व इनामें अविभाज्य केली. त्याकाळात राजर्षींचा हा निर्णय क्रांतिकारी होता. दि.२२ मार्च,१९२० रोजीच्या माणगाव परिषदेत प्रमुख वक्ते म्हणून भाषण करताना राजर्षींनी सांगितले होते –"आज सर्व लोक वतनाच्या मागे लागले आहेत. ते वतन तर किती? १,२ आरे आणि पाटीभर धान्य. यात कोणाचे पोट भारत नाही. अशा स्थितीत वतनाच्या आशेने गावी राहाणे भाग पडल्याने चोऱ्या, वगैरे इतर गुन्हें केल्याशिवाय दुसरा मार्ग उरत नाही. म्हणून तुम्ही लहान वतनें व बलुटी यांच्या मागे लागू नका; ती सोडून द्या. विशेषकरून महार लोकांनी आपल्या जमिनीचे असे तुकडे करा की साधारण दहा एकर जमीन वाट्याला येईल. हे उत्पन्न तुमच्यातील जे वाडवडील असतील त्यांच्याकडे जसे पाटील, सनदी, शिलेदार यांच्याकडे असते तसे चालवा." यावर महार लोकांनी आपखुशीने इनाम जमिनी रयतावा करून मिळणेसाठी राजर्षींकडे अर्ज केला. त्यास राजर्षींनी अनुमती देवून हुजूर ऑर्डर क्र. १६३ दि. ०५/०८/१९२१ नुसार आदेश काढून त्यांच्या जमिनी रयतावा हक्काने कायम केल्या. अशाप्रकारे राजर्षींनी कायदा आणि समाज जागृती करून शेती विभाजनास विरोध केला.

शाहू महाराजांनी सुमारे २८ वर्षे (सन १८९४ ते सन१९२२) राज्यकारभार केला. शाहू राजांना बहुजनांच्या उद्धाराविषयी तळमळ होती. या अल्प कालावधीत त्यांनी भविष्यातील शंभर पेक्षाही अधिक वर्षांचा वेध घेतलेला होता. कोल्हापूर संस्थांनच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, कृषि, उद्योग, आदि क्षेत्रांमध्ये सर्वांगीण विकासाची व्यूहरचना आखली. शिक्षणाने आणि ज्ञानाने जरी ते अर्थशास्त्राचे विद्यार्थी नसले तरी प्रत्यक्षात अर्थशास्त्री होते. अशा या महान राजर्षींचा कायिक अंत ६ में १९२२ रोजी झाला. मात्र ते अद्याप लोकराजे म्हणून अजरामर आहेत. त्यांना माझा मानाचा मुजरा!

**शेतीक्षेत्राचा शाहूकालीन तपशील आणि सद्य स्थिती:**

| अ.नं. | तपशील | शाहूकालीन स्थिती | सद्य स्थिती |
|---|---|---|---|
| १ | पिकाखालील क्षेत्र | १७३६५७८ एकर (१९२०-२१) | ५७५५७० हेक्टर |
| २ | ओलिताखालील क्षेत्र | २३३१९ एकर | १३५५१० हेक्टर |
| | चहा/कोफी लागवड | ११एकर २१ गुंठे (भुदरगड)<br>कोफी -४ एकर १८ गुंठे (पेंडखळे-पन्हाळा), दालचिनी-१ एकर २० गुंठे | - |
| ३ | विहिरींची संख्या | १२०५७ | १०९४० |
| ४ | बोअरवेलची संख्या | | ११२ |
| ५ | तलाव | रंकाळा, कळंबा, वडीनगे, सरूड, सोनवडे, अतिग्रे, भेडसगाव, निगवे, कोतोली | रंकाळा, कळंबा, वडीनगे, सरूड, सोनवडे, अतिग्रे, भेडसगाव, निगवे, कोतोली |
| ६ | उपसा जलसिंचन योजना | | ३०१९५ |
| | धरणे | राधानगरी (लक्ष्मी), | |
| ७ | पम्पसेट्स / ओईल इंजिन | ओईल इंजिन्स - | पम्पसेट्स ८००२९ |
| ८ | ट्रक्टर्स | | ५९३२ |
| ९ | मुख्य पिकें – | ऊस – ३५०३० एकर(१९१६-१७)<br>भात – १९८९५० एकरp<br>भुईमुग –५६३०० हेक्टर<br>सोयाबीन –५३९००हेक्टरज्वारी – ३२२२४७ एकरफळबागा - | ऊस – १४५३०० हेक्टर<br>भात – ११२४०० हेक्टर<br>भुईमुग – ५६३०० हेक्टर<br>सोयाबीन – ५३९००हेक्टर<br>ज्वारी – १७१०० हेक्टर<br>फळबागा – ६७८ हेक्टर |
| १०. | पशुधन | १४९७००० | १२००७००. |
| ११ | शेल्यामेंध्या | | २८५५०० |
| १२ | कुक्कुटपालन | | ३८५९८०० |
| | रेशीम उद्योग | वळीवाडी (भुदरगड) व राधानगरी | |
| १३ | अर्थसहाय्य | तगाई आणि अल्पदराने कर्ज<br>तगाई- रु. २५७०/- कर्ज रु. ८१९२५/-(२०११-१२)<br>विक्टोरिया मेमोरिअल फंड- शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण कमी करणेसाठी.(१९१२-१३) | कृषीविषयक सरकारी आणि सहकारी विविध योजनां |
| १४ | सहकारी संस्था | किग एडवर्ड अॅग्रीकल्चर इन्स्टीट्युट – म्युझियम (१९१२)- खतें व बीबियाणे वाटप, शेतीशिक्षणाचा खर्च संस्थेमार्फत<br>श्री शाहू स्पिनिंग मिल्स (१९०९)<br>श्री शाहू विणकरी असोशिएशन, रायबाग (१९०९-१०),जिनिंगफॅक्टरीज- कोल्हापूर, चिन्चली, शिरोळ, व गडहिंग्लज.शेंगदाणा गाळप गिरण्यां – एकूण ११. सन १९२० मध्ये केवळ २ कार्यरत.दळप गिरण्यां – एकूण९.(१९२१-२२),साखर कारखानेंगुऱ्हाळघरें | सहकारी विविध योजनां |
| १५ | बँका / पतपेढ्यां | | सरकारी बँका, सहकारी बँका आणि कृधि सेवा संस्था |
| १६ | बाजारपेठां | शाहू मार्केट यार्ड, सांगरूळ, पन्हाळा, कोडोली, माले, सरूड,वडगाव, आळते, मलकापूर, कापशी, गडहिंग्लज, मुरगूड,उत्तूर, इ. | कृषी उत्पन्न बाजार समित्यां,<br>कृषी सेवा केंद्रे, स्थानिक बाजारपेठा |
| १७ | आयात-निर्यात केंद्रे - | सन १९१०-११ पासून कोल्हापूर रेल्वेस्टेशन व हातकनंगलेमधून धान्य, तेलबिया, साखर यांची निर्यात. | सध्याची आयात-निर्यात केंद्रेही सरकारी नियमनातून कार्यरत आहेत. |




**शेतीधोरणाची समकालीन प्रासंगिकता -** शाहू महाराजांनीशेतीधोरणाची अंमलबजावणी विसाव्या शतकाच्या सुरुवातीस केली होती. आजही त्यांचे शेतीधोरण लागू होते.

**1.** शाहू महाराजांनी त्यावेळी कृषिकर्म हे पवित्र कर्म आहे आणि त्यामुळे संपूर्ण मानवजातीची उपजीविका होते हे पटवून सांगितले होते.

**2.** शाहू महाराजांनी शेती आणि शिक्षण यांचा पारस्पारिक संबंध स्पष्टकारत्न सांगितले होते की, शेतकरी कष्टाला कमी पडत नाही; पण शेतीमध्ये आधुनिकता आणायची असेल तर त्याने शिक्षण घेतले पाहिजे. हे तत्व आजही लागू पडते.

**3.** शाहू महाराजांनी शेतकऱ्यांनी पारंपारिक शेती करण्याचे सोडून नवनवे तंत्रज्ञान, यंत्रें व बी-बियाणांचा वापर करुन उत्पादन वाढवावे यासाठी प्रोत्साहन दिले; त्यासाठी कृषी पतपेढ्यां स्थापन केल्या. आजमीतीस ही संकल्पना लागू पडते. आजही शेती उत्पादन वाढवण्यासाठी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, संकरीत बी-बियाणे, यांत्रिकीकरण यांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे.

**4.** शाहू महाराजांनी त्याकाळी शेतीमाल विक्री व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी बाजारपेठ निर्माण केली होती. शेतमालाला योग्य भाव मिळावा ही त्यामागची भूमिका होती. त्याचबरोबर विक्रीव्यवस्थेमधील दलाल, अडतें, व्यापारीं, यांची साखळी कमी व्हावी यासाठीसुद्धा हे धोरण मांडले होते. आजच्या परिस्थितीमध्ये सुध्दा हे धोरण तंतोतंत लागू पडत आहे.

**5.** शाहू महाराजांनी निर्माण केलेली जलसिंचन व्यवस्था अप्रतिम स्वरुपाची होती. केवळ मान्सूनवर अवलंबून न रहाता पर्यायी सिंचनाची व्यवस्था करणेस त्यांनी प्राथमिकता दिली. आजही जलसिंचनाच्या सुविधां असल्या तरी त्या योजना पुरेशा प्रमाणात नाहीत. सिंचनाचा प्रश्न तसाच आहे. निसर्गातील जलस्त्रोत कमी होत आहेत. वेळीच जलसिंचन उपाययाजना अमलात आणायला हव्यात.

**6.** शाहू महाराजांनी आपल्या संकल्पनेतून प्रयोगशील शेतीचे प्रयोग करताना नवीन पिकलागवड, आधुनिक पद्धतीने शेती करणे, शेतीविषयक प्रदर्शनें भरविणे, अशी कामें केली. आजच्या परिस्थितीत शेतीमध्ये समृद्धी आणावयाची असेल तर असे नवनवीन प्रयोग करणे गरजेचे आहे.

**7.** शाहू महाराजांनी आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले होते की सर्व लोकांनी केवळ शेतीवर अवलंबून राहू नये; लोकांनी शेतीस पूरक असे जोडव्यवसाय करणे गरजेचे आहे. त्यासाठी शेळीमेंढीपालन, कुक्कुटपालन, पशुधन, रेशीम उद्योग, मधुमक्षिका पालन यासारखे व्यवसाय करून उत्पन्न वाढविले पाहिजे. आजही असे शेतीपूरक व्यवसाय वाढविले तर बऱ्याच प्रमाणात ग्रामीण बेरोजगारी कमी होईल आणि कुटुंबांचे उत्पन्नही वाढेल.

**8.** शाहू महाराजांनी शेतीविभाजनास विरोध केला होता. त्यावेळी लोकसंख्याही कमी होती. आज ती वाढलेली दिसून येते. अशावेळी जमिनीचे लहानलहान तुकडे केले तर पिकउत्पादन कमी भरते. साहजिकच, शेतकऱ्यास कमी उत्पन्न मिळते. ही संकल्पना आजही लागू पडते. जमिनीचा आकार मोठा असला पाहिजे.

**9.** शाहू महाराजांनी वतनें म्हणून दिलेल्या जमिनी रयतावा पद्धत अवलंबून कायम करून दिल्या. यातून त्यांनी संस्थानच्या सेवेकऱ्यांची, बाराबलुतेदारांची कायमची उत्पन्नाची सोय केली. जमिनीचे वाटप खालच्या वर्गापर्यंत कसे करता येईल हे पहिले आणि त्याप्रमाणे केले. ही त्यांची समानतेची दूरदृष्टी होती.

**अनुमान** –राजर्षी छत्रपती शाहू महाराजक्रांतिकारी होते. त्यांना दोन प्रकारची क्रांती घडवून आणावयाची होती –एक, सामाजिक क्रांती आणि दुसरी, भौतिक क्रांती. दारिद्र्यामुळे आर्थिक मागासलेपण येते. हे आर्थिक मागासलेपण नाहीसे करावयाचे असेल तर दारिद्र्य नाहीसे केले पाहिजे. भारत हा देश कृषीप्रधान असलेमुळे छोट्या छोट्या जमिनींच्या तुकड्यामध्ये फारसे काही पिकत नाही; पुरेसे उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे शेतकरीवर्ग दारिद्र्यात राहिला; त्याच्या वाट्याला दारिद्र्य आले. हे जर घालवावयाचे असेल तर कृषीमध्ये अमुलाग्र बदल झाला पाहिजे हे त्यांना माहित होते.[iv] सर्व प्रथम पाण्याची व्यवस्था केली पाहिजे. म्हणून त्यांनी राधानगरी धरण बांधले; अनेक बंधारें बांधले. कोल्हापूरमध्ये त्यांनी कृषी-संग्रहालय काढले. त्यांनी या क्षेत्रात नवीन वाटां शोधून काढल्या. शाहुमहाराजानी कुणबी, शेतकरी, मागासवर्गीय लोक, यांचा प्रामुख्याने सर्वार्थाने विचार केला. शाहू महाराजांच्या कार्यातून अर्थशास्त्राच्या विचारांचे आणि शेती सिद्धांतांचे स्वरूप दिसून येते. त्यांनी जातीधर्माच्या जोखडात अडकलेल्या समाजाला अर्थार्जनाचे अनेक पर्याय दिले. त्यातून सर्व समाजाने विशेषत: शेतकरी वर्गाने आपला उद्धार करून घ्यावा अशी त्यांची उत्कट इच्छा दिसून येते. शेतीच्या माध्यमातून समाजोन्नती व्हावी असे गृहीत धरणारे ते क्रांतिकारी होते. त्यांनी उपयोजिलेली शेतीची धोरणें, उपाय, आणि प्रात्यक्षिकें ही तत्कालीन समाजास उन्नतीकडे नेणारी होती; तसेच, तीं आजघडीसही लागू होतात. कोल्हापूर जिल्ह्याला लाभलेली श्रीमंती आणि वैभव हे सर्व शाहू महाराजांच्यामुळे झालेले आहे. म्हणूनच, आजही कोल्हापूरचे दरडोई उत्पन्न सर्वात जास्त आणि पहिल्या क्रमांकावर आहे.



***संदर्भ:***

i पुस्तक - राजर्षीशाहूछत्रपती: जीवनकार्य, पणन. ४१. लेखक- प्राचार्यरा.तु. भगत.

ii पुस्तक –आर्थिकविचारांचाइतिहास (भाग२) लेखक – डॉ. जेएफ. पाटील, डॉ. आर. एस. म्होपरे, डॉ. आर. ए. वायींगडे, डॉ. असबी. यादव

iii पुस्तक- राजर्षीशाहूमहाराजांचीनिवडकभाषणेंआणिआज्ञापत्रें (पानन. ५९) संपादक – प्रदीपगायकवाड

iv डॉ. जयसिंगरावपवारयांचेव्याख्यानविषय-‘शाहूमहाराजांचेकृषीआणिऔद्योगिकधोरण’.

5. कोल्हापूर जिल्हा – संभाव्य पिक आराखडा २०१७

6. कोल्हापूर संस्थानच्या समान्य प्रशासनाचा रिपोर्ट (१९१५-१६)

7. इंटरनेट https://en.wikipedia.org › wiki › Shahuof Kolhapur

8. इंटरनेट https://www.culturalindia.net › reformers › shahu-chhatrapati